म.वि.प्र. समाजाचे,
के. टी. एच. एम. कॉलेज, नाशिक– ४२२ ००२

जा.क्र. /२०२२-२३ दिनांक- १२.१०.२०२२

# M.Com Part-I

## Online Admission Process

के.टी.एच.एम.महाविद्यालयाच्या एम.कॉम भाग-१ पदव्युत्तर वर्गांचे प्रवेश ऑनलाईन प्रक्रियेव्दारे होणार आहेत. एम.कॉम भाग-१ प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी **www.kthmcollege.ac.in** किंवा **https://mvperp.org/admission** या संकेत स्थळाला भेट देऊन आपला मेरीट फॉर्म भरावयाचा आहे. मेरीट फॉर्म भरण्यासाठी दि.१३ ऑक्टोंबर २०२२ ते १६ ऑक्टोबर २०२२ पर्यंत संकेतस्थळ उपलब्ध असेल. मेरिट फॉर्म भरल्यानंतर विद्यार्थ्यांने मेरिट फॉर्म प्रिंट काढून जपून ठेवावा. दि. १७ ऑक्टोबर २०२२ रोजी ४.०० वा. संकेतस्थळावर प्रथम मेरिट लिस्ट प्रकाशित केली जाईल. निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी दि.१८ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर २०२२ या कालावधीत संकेतस्थळाला भेट देऊन आपला ॲडमिशन फॉर्म भरुन त्याची प्रिंटआऊट काढून त्यासोबत मेरिट फॉर्मची प्रत, मूळ गुणपत्रकासह तीन झेरॉक्स प्रत, शाळा सोडल्याचा मूळ दाखला व दोन झेरॉक्स प्रत, शैक्षणिक खंड पडला असल्यास गॅप सर्टिफिकेट सोबत जोडावे. विविध प्रकारच्या स्कॉलरशीप घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी सोबत रेशन कार्ड, आधार कार्ड, डोमेसाईल झेरॉक्स, उत्पन्नाचा दाखला झेरॉक्स प्रत, विद्यार्थ्यांचे बँक पास बुक झेरॉक्स प्रत तसेच माजी सैनिक पाल्य असल्यास पालकाचे प्रमाणपत्र जोडावे.

विद्यार्थ्यांनी संबंधित विभागात जाऊन विभागप्रमुखाकडून आपला ॲडमिशन फॉर्म तपासून घेवून त्यावर त्यांचे नांव व स्वाक्षरी तारखेसह घ्यावी. फॉर्म तपासून **Ok** केल्यानंतर तो **Admission Counter** वर फी सह सादर करावा व प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यावर पावती घेऊन जपून ठेवावी. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी स्वतंत्र व्यवस्था केली आहे. प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मेडिक्लेमची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

ॲडमिशन फॉर्म जमा करतांना जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रेशन कार्ड, आधार कार्ड जात वैधता प्रमाणपत्र, बँक पासबुक, नॉनक्रिमीलीयर प्रमाणपत्र, विद्यार्थी सुरक्षा फॉर्म व मेडिक्लेम फॉर्म इ. कागदपत्रांच्या छायांकित प्रतीची पुर्तता संबधित विद्यार्थ्यांनी करावी अन्यथा अपूर्ण कागदपत्रे असल्यास स्कॉलरशीपचा फॉर्म भरता येणार नाही याची विद्यार्थ्यांने नोंद घ्यावी.

प्रथम फेरीनंतर उपलब्ध जागांसाठी वरील संकेतस्थळावर दि. २० ऑक्टोबर २०२२ रोजी सायंकाळी ४.०० वा. दुसरी मेरिटलिस्ट प्रकाशित केली जाईल. या प्रवेश यादीतील विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश दि.२१ ऑक्टोबर रोजी पूर्ण करावा.

विद्यार्थ्यांना अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**Website :- www.kthmcollege.ac.in OR https://mvperp.org/admission**

| अ.नं. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १. | **Online** मेरिट फॉर्म भरण्यासाठी संकेत स्थळावरील लिंकची उपलब्धता | दि. १३ ऑक्टोबर ते १६ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत ऑनलाईन मेरिट फॉर्म भरणे. |
| २. | पहिली मेरिट यादी प्रसिध्दी | दिनांक १७ ऑक्टोबर २०२२ रोजी सायंकाळी ४.०० वा. |
| ३. | पहिल्या मेरिट यादीतील ॲडमिशन | दि.१८ ते २० ऑक्टोबर २०२२ या कालावधीत विद्यार्थ्यांनी पहिल्या मेरिट यादीतील प्रवेश घ्यावयाचे आहे. |
| ४. | दुसरी मेरिट यादी प्रसिध्दी | दि. २० ऑक्टोबर २०२२ रोजी सायंकाळी ४.०० वा. |
| ५. | दुसऱ्या मेरिट यादीतील ॲडमिशन | दि. २१ ऑक्टोबर २०२२ रोजी विद्यार्थ्यांनी दुसऱ्या मेरिट यादीतील प्रवेश घ्यावयाचे आहे. |

(डॉ.व्ही.बी.गायकवाड)

प्राचार्य